महत्त्वाचे



## सोन्याने मढविली १११ फूट शिवमूर्ती; आज लोकार्पण

**बडोदाः** बडोद्यातील सूरसागर सरोवरात १११ फूट उंचीच्या महादेव मूर्तीला सोन्याचा मुलामा देण्याचे काम पूर्ण झाले. तब्बल ३ वर्षे लागली. मूर्तीसाठी एकूण १२ कोटी रुपये खर्च आला. मूर्तीवर १७.५० किलो सोन्याचा मुलामा चढविण्यात आला आहे. शनिवारी महाशिवरात्रीनिमित्त मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल या मूर्तीचे लोकार्पण करणार आहेत.

# हरियाणात कारसह जळालेले २ मृतदेह आढळल्याने तणाव

### कुटुंबीयांकडून पोलीस, बजरंग दलावर आरोप, गोरक्षा प्रमुख मानेसर फरार

**भिवानी : वृत्तसंस्था**

हरियाणातील भिवानी येथील लोहारू गावात बोलेरो गाडी जळालेल्या अवस्थेत आढळली. गाडीत दोन मृतदेहही जळालेल्या अवस्थेत होते. मृतांची ओळख पटली असून जुनैद (वय ३५) आणि नसीर (२८) अशी त्यांची नावे आहेत. गोवंश तस्करीच्या संशयावरून बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी या दोघांना जाळल्याचा आरोप दोघांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

दोघे मृत हरियाणा सीमेला लागून असलेल्या राजस्थानच्या भरतपूर जिल्ह्यातील घाटमिका या गावचे आहेत. फिरोजपूर झिरका येथील क्राईम इन्व्हेस्टिगेशन एजन्सीच्या (सीआयए) पोलिस पथकाने बोलेरोला धडक देऊन जुनैद आणि नसीर यांना पकडले होते. यानंतर पोलिसांनीच त्यांना अर्धमेल्या अवस्थेत बजरंग दल कार्यकर्त्यांच्या स्वाधीन केले. गोवंश तस्करीच्या संशयावरून या कार्यकर्त्यांनी दोघांना बोलेरोसह जाळले, असा खळबळजनक आरोप जुनैद आणि नसीरच्या कुटुंबीयांनी केला आहे.





> पोलिसांचा या प्रकरणाशी काही संबंध नाही. पोलिसांनी आरोपी पकडलेच नाहीत आणि भारतात पोलिस आरोपींना असे कुणाच्याही स्वाधीन करत नाहीत.
> - **वीरेंद्र सिंह,** प्रभारी, क्राईम इन्व्हेस्टिगेशन एजन्सी, फिरोजपूर झिरका

**मोनू मानेसर संशयाच्या भोवऱ्यात**

हरियाणा बजरंग दल गोरक्षा प्रमुख मोनू मानेसर तसेच रिंकू सैनी आणि इतर ७-८ जणांनी जुनैद, नासीरला भिवानीत नेले आणि मागच्या सीटवर बसवून जिवंत जाळले. इंजिन व चेसीस नंबरवरून बोलेरो आमची होती हे समजले, असे या दोघा मृतांच्या कुटुंबीयांनी सांगितले.

**मोनू मानेसरवर याआधीही आरोप, पण...**

यापूर्वी २९ जानेवारी रोजी तावडू परिसरात वारिस नावाच्या व्यक्तीची कार एका टेम्पोला धडकली. यात वारिसचा मृत्यू झाला होता. याप्रकरणातही वारिसच्या नातेवाईकांनी मोनू मानेसर आणि त्याच्या साथीदारांवर आरोप केला होता; मात्र सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर हा अपघात असल्याचे समोर आले होते.

**मोनू मानेसर फरार**

मोनू मानेसर आणि गो-तस्करांदरम्यान दिल्ली-एनसीआर भागात अनेकदा संघर्ष झाला आहे. भिवानीतील प्रकारानंतर मानेसर फरार आहे. घटनेच्या वेळी मी एका हॉटेलमध्ये होतो, असा खुलासा मानेसरने केला आहे. अलीकडेच एका गोतस्कराने मोनू मानेसरला ठार मारण्याची धमकी दिली होती.

## गोरखपूरमध्ये हत्तीने चिरडल्याने ३ जण ठार

### मिरवणुकीसाठी आणला, गर्दी पाहून बिथरला



**गोरखपूर : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशातील गोरखपूरमध्ये कलश मिरवणुकीसाठी आणलेला हत्ती गर्दी पाहून बिथरला आणि त्याने अनेकांना पायदळी तुडविले. या घटनेत तीन जण ठार, तर अनेकजण जखमी झाले आहेत. घटनेनंतर समारंभ रद्द करण्यात आला. चिलुआताल भागातील जगतबेलालगतच्या मोहम्मदपूर माफी गावात ही दुर्घटना घडली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार काही जणांनी हत्तीची छेड काढली. त्यामुळे हत्ती चवताळला. कांती देवी (वय ५५) व कौशल्या देवी (५०) या २ महिलांसह कृष्णा (४) या मुलाचा दुर्घटनेत बळी गेला.

**याआधी माहुताला केले ठार**

हत्तीचे नाव प्रसाद असून, तो भाजप आमदार विपीन सिंह यांच्या मालकीचा आहे. विपीन सिंह गोरखपूर ग्रामीणचे आमदार आहेत. या हत्तीनेच १३ जानेवारी २०२० रोजी शब्बीर नावाच्या माहुताला आपटून ठार केले होते.

**मुलाला सोंडेत धरून आपटले**

कृष्णा काही दिवसांपासून आजारी होता. तो बरा व्हावा म्हणून त्याला कुटुंबाने या कार्यक्रमात आणले होते. कृष्णाच्या आईने हत्तीची पूजा केली आणि मुलाला आशीर्वाद द्यावा म्हणून पुढे केले तर हत्तीने मुलाला सोंडेत धरून आपटून ठार मारले.


पुढारी Classified is Now Simplified... छोजा फक्त एका क्लिकवर Click classified.pudhari.news

**पाहिजेत**

**घरी बसून मोबाईल** द्वारा रजिस्टर्ड काम करण्यासाठी मुले मुलींची आवश्यकता आहे. मिसकॉल : ०२२४०३७५७२०

**घरकामासाठी महिला, मुली,** मुले, नर्स, जोडपे, हॉटेल स्टाफ राहणे + खाणे फ्री ९३२६६८२३७८, ९८२०६९३५०१

**मुंबई/दिल्लीमध्ये घरकामासाठी बेबीकेअर,** जापाबाई, कुकींगसाठी बायका, मुली पाहिजेत संपर्क- ८९२८०५७२१७, ९१३६८६५८०४

**व्यवसाय**

**फ्रिफ्रिफ्रि**- कोल्हापूरातील सुप्रसिद्ध टी ब्रॅन्डच्या १०० फ्रँचायसी फ्रिदेणे आहेत. स्पॉट असलेल्यांनी संपर्क- मो. ९३७०३०३०३०, ८७८८९८९२०६.

**औषधोपचार**

**डायबिटीजसाठी एकमात्र उपाय** नैसर्गिकरित्या इन्सुलिन वाढवते इतर औषधासमवेत घेता येते, पॅनक्रिया पावर. सर्व वयो. ७०२००३७३१०.

**प्लॉट/फ्लॅट**

**मौजे कातरंग खोपोली** (रायगड) येथे ३६४ चौ मीटर चा एन.ए. प्लॉट विकणे आहे. ९८५०८०३१९०.

**विवाह**

**वर पाहिजे वधु** २७, उंची ५.४, शिक्षण १०वी, मुलगी बेकरीचे पदार्थ बनवते. जातीची, शिक्षणाची अट नाही. त्वरित विवाह. ८६२३९४७२९४, ९०२८००५४४६.

**वधू ३१, १२वी** पास मुलगी घरगुती खानावळ चालवते. मुलीला, विधूर, घटस्फोटीत चालेल. शिक्षण, वय अट नाही. अंतरजातीय चालेल. त्वरित विवाह. ८४४६४१७०३८.

**वधू वय २७,** उंची ५.३, शिक्षण १०वी, मुलीला वडील नाही. सर्व शेतीकाम व गृहउद्योग करते. गरीब, शेती, व्यापार करणारा मुलगा चालेल. जातीची अट नाही. ७०२०१०१४५७, ९८३४६९९३५८.

**ब्राम्हण समाजाची गरिब** व संस्कारी मुलगी आहे. वर पाहिजे. वधू वय २७, उंची ५.३, रंग गोरा, शि. १०वी, घरगुती मुलगी आहे. जातीची व नोकरीची अट नाही. शेतकरी व गरिब मुलगा चालेल. त्वरित विवाह. ८४६८९५९७६७, ९०२१५४९२०३.

**वाचकांसाठी निवेदन**

पुढारी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे याची पुढारी पब्लिकेशन्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी पुढारी पब्लिकेशन प्रा. लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## लग्नानंतरही प्रदीर्घ काळ संबंध ठेवले तर ते सहमतीनेच : हायकोर्ट

**चंदीगड :** एखाद्या पुरुषाचा दुसऱ्या महिलेशी विवाह झाल्यानंतरही त्याच्याशी एखादी स्त्री प्रदीर्घकाळ लैंगिक संबंध ठेवत असेल तर ते लग्नाचे आमिष देऊन ठेवलेले संबंध मानता येत नाहीत, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने बलात्काराच्या एका प्रकरणातील सुनावणीदरम्यान नोंदविले. महिलेची याचिका फेटाळून लावली आणि आरोपीची निर्दोष मुक्तताही केली. याचिकाकर्त्या महिलेचे आरोपीसोबत त्याच्या लग्नापूर्वीही शारीरिक संबंध होते. आरोपीचे अन्य महिलेशी लग्न झाल्यानंतरही तिचे त्याच्याशी पुढे अनेक वर्षे संबंध होते. त्यामुळे ते बळजबरीचे संबंध होते असे म्हणता येत नाही. याचिकाकर्तीने आपल्या याचिकेत स्वतःच २०१२ ते २०१८ पर्यंत आपले आरोपीशी शारीरिक संबंध असल्याचे मान्य केले आहे. सलग ६ वर्षे संबंध ठेवण्याला बळजबरीचे संबंध म्हणता येत नाही. याचिकाकर्ती सुशिक्षित आहे.

## गॅस टँकर-ट्रेलर धडकेत अजमेरला ४ जिवंत जळाले

**अजमेर :** अजमेरमधील राष्ट्रीय महामार्ग-८ वर मध्यरात्री गॅस टँकर आणि ट्रेलरची धडक झाली. धडकेसह स्फोट होऊन भोवतालचा ५०० मीटर परिसर आगीचा गोळा बनला. चार जण जिवंत जळाले. महामार्गावरून जाणाऱ्या दोन ट्रकसह अनेक दुचाकीही पेटल्या. लगतची दहा घरे खाक झाली. गॅस टँकरचा चालक, ट्रेलरच्या चालकाचा कोळसा झाला. रस्त्यावरून जात असलेले अन्य दोघे आगीत सापडून मरण पावले. चा जण गंभीररित्या होरपळले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अडीच तासांनंतर रात्री तीन वाजता आग आटोक्यात आली.

# तुर्कीसह सीरियासाठी १ अब्ज डॉलर जमवावे

### संयुक्त राष्ट्रांचे आवाहन; मृतांची संख्या ४२ हजारांवर

**अंकारा/दमिष्क : वृत्तसंस्था**

तुर्की व सीरियातील भूकंपग्रस्तांसाठी १ अब्ज डॉलर्सचा निधी गोळा करावा, असे आवाहन संयुक्त राष्ट्रांनी केले आहे. दोन्ही देशांतील मृतांची संख्या आता ४२ हजारांवर गेली आहे.

बचावकार्य अंतिम टप्प्यात आलेले असताना सोशल मीडियावर भूकंपाबद्दल दहशत निर्माण करणाऱ्या पोस्टप्रकरणी ७८ जणांना तुर्की पोलिसांनी अटक केली आहे. तुर्की सरकारने आजवर ३५,४१८ मृतदेह हाती लागल्याचे, तर सीरियन सरकारने ५८०० वर मृतदेह हाती लागल्याचे स्पष्ट केले आहे. तुर्कीने मदत कार्य पूर्ण करण्यासाठी १ लाखांवर कर्मचारी नेमले आहेत. ५ हजार ५०० वाहने त्यासाठी सातत्याने राबत आहेत. संयुक्त राष्ट्रांनी केलेल्या आवाहनादरम्यान भारतासह जगभरातील ९५ देशांनी तुर्कीला मदत करण्याची तयारी दर्शविली आहे.



## ■ शब्दकोडे क्रमांक १८९९

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ |
| ६ | | ■ | ७ | ८ | | ■ | |
| | ■ | ९ | | | ■ | १० | ■ |
| ■ | ११ | ■ | | ■ | १२ | | |
| १३ | | १४ | | ■ | १५ | | ■ |
| | ■ | | ■ | १६ | | ■ | १७ |
| १८ | १९ | | ■ | ■ | २० | २१ | |
| ■ | | ■ | २२ | ■ | २३ | | ■ |

**आडवे शब्द** : १) कॉम्प्युटर ४) पुणे जिल्ह्यातील खंडेरायाचे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र ६) घट, वजावट ७) हात पुसण्यासाठीचे कापड ९) खंडोबांची द्वितीय पत्नी १२) मंदिराचा टोकाचा भाग १३) दुर्लक्ष १५) चामखीळ १६) प्राचीन काळी युद्धात वापरले जाणारे एक हत्यार १८) रामायणातील इंद्रजितचा पिता २०) भाजी करण्यासाठीचे स्वयंपाकघरातील एक साधन २२) मड्ड २३) उर्मी, मेंढीच्या केसांपासून बनवलेले एक पांघरुण

**उभे शब्द** : १) तृप्त २) विभाग ३) रामदासांनी रचलेली प्रार्थना ४) तुरुंग ५) पद्धत ८) आईसाठी वापरला जाणारा एक शब्द १०) तीन पानांचा वृक्ष ११) उपवासासाठी खाल्ले जाणारे एक पौष्टिक फळ १२) भगवान विष्णूंचे एक नाव १३) व्यवसायाचा व्याप, पसारा १४) भांडे झाकण्याचे आवरण १७) मारुतीला अर्पण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पानांचा वृक्ष १९) वाकडा २१) मेघ.

**शब्दकोडे क्रमांक १८९८ चे उत्तर : आडवे शब्द** : १) ज्वालामुखी ३) वास्तव, ५) प्रेम ७) वाम ८) बाव ९) कफल्लक १०) वाकी ११) मीरा १२) बगळा १५) गाळ, १६) वाफ १७) रागीट १९) तरफ २०) औजार. **उभे शब्द** : १) ज्वारी २) मुक्त ३) वाम ४) वळीव ५) प्रेम ६) अफरातफर ७) वाकबगार ८) बाकी, ९) कमी १०) वाळा १३) गळ १४) परीट १६) वात १७) राजा १८) गीर.

**सुडोकू क्र. ३२४८**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | | | ४ |
| | | ३ | |
| | १ | २ | |
| १ | | | |

**कसे सोडवाल सुडोकू?**

सुडोकू सोडवताना उभ्या आणि आडव्या चार कॉलममध्ये एक ते चार हे अंक उभे किंवा आडवे असे बसवा की ते एका सरळ रेषेत एकदाच आले पाहिजेत.

**उत्तर क्र. ३२४७**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | २ |
| ३ | २ | १ | ४ |
| ४ | १ | २ | ३ |
| २ | ४ | ३ | १ |

# लंडननंतर सर्वाधिक ट्रॅफिक जाम बंगळूरमध्ये

### पुणे सहाव्या, मुंबई ४७, तर दिल्ली ३४व्या स्थानी : 'टॉमटॉम'ची माहिती



**बंगळूर : वृत्तसंस्था**

ब्रिटनची राजधानी लंडननंतर भारतातील बंगळूर सर्वात जास्त वाहतूक कोंडी होणारे जगातील दुसरे महानगर आहे. डच लोकेशन टेक्नॉलॉजी स्पेशॅलिस्ट टॉमटॉमच्या निर्देशांकातून ही माहिती समोर आली आहे. बंगळूरच्या लोकांना गतवर्षी कारने १० कि.मी. अंतर कापण्यासाठी जवळपास अर्धा तास (२९ मिनिटे, १० सेकंद) लागतो. ट्रॅफिक जामच्या यादीत दिल्ली आणि मुंबई अनुक्रमे ३४ वे व ४७ व्या स्थानी आहेत. पुणे या यादीत सहाव्या स्थानी आहे.

१ लंडनमध्ये २०२२ मध्ये १० कि.मी. प्रवासासाठी सरासरी ३६ मिनिटे, २० सेकंद लागले. बंगळूरूत २०२१ च्या (१४ कि.मी.) तुलनेत काहीशी सुधारणा झाली. गर्दीच्या वेळी सरासरी गती ताशी १८ कि.मी. होती.

२ बंगळूर २०२१ मध्ये १० वे सर्वाधिक जामचे शहर होते. या शहरात लोकांनी सरासरी २६० तास (१० दिवस) ड्रायव्हिंगमध्ये व १३४ तास जाममध्ये घालवले.

३ आयर्लंडचे डब्लिन तिसरे सर्वाधिक जामचे शहर ठरले. सहा खंडांतील ५६ देशांतील ३८९ शहरांचा या सर्व्हेअंतर्गत वाहतूक कोंडी समस्येवर वर्क फ्रॉम होम हा एक उत्तम उपाय ठरू शकतो, असा निष्कर्ष काढण्यात आला.

**जगातील आघाडीची जाम शहरे**

| शहर | १० किमीसाठी | शहर | १० किमीसाठी | शहर | १० किमीसाठी |
|---|---|---|---|---|---|
| लंडन | ३६ मि. २० से. | साप्पोरो | २७ मि. ४० से. | बुखारेस्ट | २७ मि. २० से. |
| बंगळूर | २९ मि. १० से. | मिलान | २७ मि. ३० से. | लिमा | २७ मि. १० से. |
| डब्लिन | २८ मि. ३० से. | पुणे | २७ मि. २० से. | मनिला | २७ मि. ०० से. |


**एल&टी फायनान्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परगणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** बदलापुर

L&T Financial Services

**तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव**

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 15.02.2023 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. जयराज सिंह राणा 2. पलक जयराज राणा | मालमत्तेचा पत्ता - फ्लॅट क्र. 204, 2रा मजला, रिव्हर पार्क - ई-विंग कुळगाव बदलापुर, ठाणे, महाराष्ट्र, 421503 | MUMHL14000986, MUMHL14001107 | 22 नोव्हेंबर 2022 | रु. 1,98,152/- | रु. 56,66,325.75/- | रु. 19,81,520/- | 17/03/2023 | 22/03/2023 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **21/03/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **22/03/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **23/03/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुसार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : सनील निकम, एल अँड टी फायनान्स लि. - ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098 आणि अंकित विग, संपर्क क्र. 8668943242, एल अँड टी फायनान्स लि, ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करून घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी, कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 18.02.2023
**ठिकाण:** बदलापुर

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड



**एल&टी फायनान्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** बदलापुर

L&T Financial Services

**तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव**

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 13.01.2023 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. रविंद्र सुदामराव वानखेडे 2. उमा वानखेडे | मालमत्तेचा पत्ता - फ्लॅट क्र. 302, 3रा मजला, रिव्हर पार्क, ई विंग, कुळगाव, बदलापुर (प) महाराष्ट्र 421503 | MUMHL13000656 | 22 नोव्हेंबर 2022 | रु. 2,84,320/- | रु. 86,69,873.15/- | रु. 28,43,200/- | 17/03/2023 | 22/03/2023 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **21/03/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **22/03/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **23/03/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुसार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : सनील निकम, एल अँड टी फायनान्स लि. - ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098 आणि अंकित विग, संपर्क क्र. 8668943242, एल अँड टी फायनान्स लि, ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करून घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी, कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 18.02.2023
**ठिकाण:** बदलापुर

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड